महाराष्ट्र शासन

नागरिकांची सनद

(सन २०२३-२४)

आयुक्तालय

राज्य उत्पादन शुल्क ,

महाराष्ट्र राज्य , मुंबई.

Scanned with OKEN Scanner

अनुक्रमणिका

१ राज्य उत्पादन शुल्क यंत्रणा	1
२ विभागाचा पूर्व इतिहास	3
३ प्रस्तावना व आकृतीबंध	3-11
४ विभागाची वैशिष्टये	23
५ विभागाचे नागरीक	23
६ विभागाच्या अपेक्षा	23
७ अबकारी बाबत शासनाचे धोरण	23
८ विभागाची उद्दिष्टे	25
९ विभागाचा उद्देश	25
१० विविध अनुज्ञप्त्या मंजूर करण्यासाठी कालमर्यादा / सक्षम अधिकारी	27-53
११ देशी विदेशी मद्य किरकोळ विक्री अनुज्ञप्ती स्थलांतर करणे	55
१२ विभागातील अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक	57
१३ तक्रार निवारण अधिकारी	61
१४ नागरीक सनदेचा आढावा घेण्यासाठी मुदत	61

Scanned with OKEN Scanner

१.राज्य उत्पादन शुल्क यंत्रणा



Scanned with OKEN Scanner

२.विभागाचा पूर्व इतिहास

ब्रिटीश कालावधीत हा विभाग राज्य उत्पादन शुल्क म्हणून ओळखला जात असे. महसूल संकलीत करण्यासाठी मद्य , ताडी, अफू, गांजा व भांग इत्यादी बाबी राज्य सरकारच्या नियंत्रणाखाली देण्यात आल्या. राज्याचा महसूल वाढविण्यासाठी उत्पादन शुल्क पध्दत सन १७९० पासून सुरू करण्यात आली. त्यानंतर सन १८७८ मध्ये मद्य व गुंगी आणणाऱ्या पदार्थांच्या व्यापारातील जादा महसूल मिळण्यासाठी मुंबई उत्पादन शुल्क कायदा अंमलात आणण्यात आला.

स्वातंत्र्याची लढाई व स्वदेशी चळवळ या काळात दारुच्या दुष्परिणामावर सन १९३८ मध्ये काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनात प्रकाश टाकून पूर्ण दारुबंदी करण्यासाठी मुंबई दारुबंदी कायदा १९४९ अंमलात आणण्यात आला.दिनांक १६/६/१९४९ दारुबंदी कायदा अंमलात आल्याने राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दारुबंदी व उत्पादन शुल्क विभाग असे बदलण्यात आले.

सन १९६४ पासून दारुबंदी धोरणाचे महत्व कमी होत गेल्याने १९६८ मध्ये ताडी व बिअरची योजना अंमलात आणण्यात आली. आसवन्या व मद्य निर्माण्या स्थापन करण्यात आल्या व सन १९७३ मध्ये देशी व विदेशी दारुच्या किरकोळ विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर अनुज्ञप्त्या मंजूर करण्यात आल्या.

उपरोक्त धोरणामुळे व योजनामुळे या विभागाचा सन १९६४ मध्ये असलेला महसूल रुपये १.६४ कोटी व सन २०२१-२२ मध्ये १७२२८.८४ कोटी वाढला आहे. राज्याचा / विभागाचा शासकीय महसूल वाढविण्याचा उद्देश विचारात घेऊन या विभागाचे दारुबंदी व राज्य उत्पादन शुल्क विभागाऐवजी दिनांक **२८.१२.१९८९** पासून राज्य उत्पादन शुल्क असे नांव बदलण्यात आले व या विभागाअंतर्गत असलेल्या दारुबंदी प्रचार हा विभाग समाज कल्याण विभागाला जोडण्यात आला.

प्रस्तावना

१. या विभागाची नागरी सनद प्रसृत करताना या विभागाच्या नागरीकांना विभागा विषयी माहिती असणे आवश्यक असल्याने विभागाची रचना, कार्ये व विभागात विविध स्तरांवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची माहिती दर्शविणारी प्रस्तावना देण्यात येत आहे.

२. भारतीय संविधान १६६ अनुच्छेदान्वये महाराष्ट्र राज्य शासकीय कामकाज नियमात शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक. आरओबी.१०८९/अठरा (ओ ॲन्ड एम) दिनांक २८ डिसेंबर,१९८९ पाचवी सुधारित नियमावली १९८९ मध्ये अस्तित्वात आली. तद्नुसार या विभागाचे दारुबंदी व उत्पादन शुल्क हे नाव बदलून राज्य उत्पादन शुल्क असे करण्यात आले आहे.

३. या विभागाचे आयुक्त हे विभाग प्रमुख असून त्यांना विभागाचे कामकाज / ध्येयधोरण यांच्या पुर्ततेसाठी / अंमलबजावणी करिता मुख्यालयात एक अपर आयुक्त , एक सह आयुक्त , दोन उपआयुक्त (वरिष्ठ श्रेणी) , दोन उप आयुक्त (कनिष्ठ श्रेणी) , एक संचालक (अंमलबजावणी व दक्षता) , एक उप संचालक (सांख्यिकी व संगणक), संशोधन सहाय्यक, एक मुख्य लेखाधिकारी , लेखा अधिकारी व चार सहाय्यक आयुक्त व महाराष्ट्र भरारी पथक हे सहाय्य करतात. त्याचप्रमाणे विभागीय / जिल्हास्तरावर तसेच क्षेत्रिय स्तरावर अधिकारी व कर्मचारी सहाय्य करतात.

Scanned with OKEN Scanner

४. या विभागाकडून खालील अधिनियमांची अंमलबजावणी करण्यात येते.

अ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९.
ब) महाराष्ट्र अफू ओढण्याबाबत अधिनियम, १९३६
क) मुंबई औषधीद्रव्ये (नियंत्रण) अधिनियम, १९५९.
ड) मुंबई मळी (नियंत्रण) अधिनियम, १९५६.
इ) दि नारकोटीक ॲन्ड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस अधिनियम, १९८५.

या विभागाची प्रमुख कामे म्हणजे विविध अबकारी अनुज्ञप्त्या देणे, त्यांची नियमानुसार तपासणी करणे व विशेषत: मुंबई दारुबंदी अधिनियम १९४९ नुसार असलेल्या विविध नियंत्रणाची अंमलबजावणी करणे ही आहेत. त्याशिवाय एन.डी.पी.एस.कायदा १९८५ अंतर्गत अंमली पदार्थ विषक गुन्ह्यांचा तपास करणे गुन्हे नोंदवून त्या संबंधीची प्रकरणे न्यायालयात देखील दाखल करणे इत्यादी जबाबदारीही या विभागाकडे सोपविण्यात आली आहेत.

५. विभागीयस्तर : राज्यस्तरावर आयुक्त राज्य उत्पादन शुल्क यांनी विभागाची ध्येय धोरणे ठरविणे व शासनाच्या मान्यतेने त्याची अंमलबजावणी करणे, सदर ध्येय धोरणांची व विविध नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर अधीक्षक 'गट अ' अधिकाऱ्यांची नेमणूक केली असून तालुका पातळीवर निरीक्षक / दुय्यम निरीक्षक ध्येय धोरणांची व नियमांची अंमलबजावणी करतात.

जिल्हास्तरावरील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी (जिल्हा अधीक्षक) व आयुक्त यांच्या दरम्यान समन्वय ठेवण्यासाठी विभागीय पातळीवर तसेच जिल्हा पातळीवरील कार्यालयाचे पर्यवेक्षण व प्रशासकीय नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने दिनांक ७/९/१९८९ च्या निर्णयानुसार चार विभागीय कार्यालये, तसेच शासन निर्णय दि.१/१/२००३ अन्वये दोन विभागीय (नाशिक, कोल्हापूर) कार्यालये सुरु करण्यास तसेच शासन निर्णय दि. ०५/०१/२०२२ अन्वये आणखी दोन विभागीय कार्यालये (अमरावती, नांदेड) सुरु करण्यास मंजूरी दिली आहे. अशा रितीने या विभागात आठ विभागीय कार्यालये सुरु करण्यात आलेली आहेत.

अ.क्र.	विभागीय कार्यालयाचे मुख्यालये	अंतर्गत जिल्हे
१	ठाणे	मुंबई शहर, मुंबई उपनगरे,ठाणे , रायगड, पालघर.
२	नाशिक	नाशिक,धुळे, नंदूरबार व जळगांव
३	पुणे	पुणे,सोलापूर व अहमदनगर
४	कोल्हापूर	कोल्हापूर, सांगली , सातारा , रत्नागिरी व सिंधुदुर्ग
५	औरंगाबाद	औरंगाबाद , जालना , बीड व उस्मानाबाद
६	नांदेड	नांदेड, लातूर, हिंगोली व परभणी
७	अमरावती	अमरावती , बुलढाणा,अकोला,वाशिम व यवतमाळ
८	नागपूर	नागपूर, वर्धा,भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया.

(अ) गुन्हे अन्वेषणाच्या कामात पोलीस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागात समन्वय साधण्याच्या दृष्टिकोनातून संचालक (अंमलबजावणी व दक्षता) या पदाची निर्मिती करण्यात आली असून, सदर पद पोलीस विभागातील, जिल्हा पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या पदनियुक्ती किंवा विभागातील उपआयुक्त (वरिष्ठ श्रेणी) संवर्गातून भरण्याच्या तरतुदी आहेत. संचालक (अंमलबजावणी व दक्षता) यांच्यावर राज्यातील

Scanned with OKEN Scanner

भरारी पथकांमार्फत व अन्य कार्यकारी अधिकाऱ्यांमार्फत केल्या जाणाऱ्या गुन्हे अन्वेषणाच्या कामावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सोपविली आहे.

महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ च्या अंमलबजावणीचे काम प्रभाविपणे करता यावे तसेच या व इतर अन्य बाबी समवेत मद्यार्क निर्मिती, वापर व व्यापार यासाठी दिलेल्या अनुज्ञप्तीधारकांनी केलेल्या गैरप्रकाराबाबतची चौकशी करणे, भरारी पथकाच्या कामकाजावर देखरेख ठेवणे व हातभट्ट्यांना आळा घालणे, पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागातील अधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधणे याकरिता शासन निर्णय गृह विभाग क्रमांक पीईओ/०१८०/३/(२६०)-पीआरओ-४, दि.२० ऑगस्ट, १९८० अन्वये उपआयुक्त, दारूबंदी आणि उत्पादन शुल्क (दक्षता), महाराष्ट्र राज्य, मुंबई, या नावाने नव्याने पद निर्माण करण्यात आले. सदरचे पद अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क, वर्ग-१ या दर्जाचे करण्यात आले. तद्नंतर शासन निर्णय क्रमांक ईएसटी-३३८९/४०२(१)/पीआरओ-४, दि.२० सप्टेंबर, १९८९ अन्वये संचालक (दक्षता) या पदाचे नाव बदलून व त्याच्या श्रेणीमध्ये वाढ करून संचालक (अंमलबजावणी व दक्षता) असे करण्यात आले आणि अंमलबजावणी व दक्षता ही दोन्ही कामे त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्याचे निश्चित करण्यात आले. सदर पद पोलीस अधीक्षक श्रेणीतील अधिकारी प्रतिनियुक्तीवर घेऊन भरण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. तद्नंतर शासन अधिसूचना क्रमांक ईएसटी-३३९६/६०/ईएक्ससी-४, दि.०५ एप्रिल, २००२ अन्वये सदर पद उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क (वरिष्ठ श्रेणी) किंवा भारतीय पोलीस सेवेतील पोलीस अधीक्षक / पोलीस उपआयुक्त श्रेणीमधून प्रतिनियुक्तीद्वारे बदलीने भरण्यात येईल अशी नियमात तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे उक्त पदावर नियुक्ती दिनांक ५ एप्रिल, २००२ च्या नियमानुसार अन्वये करण्यात येत असते.

(ब) मुंबई शहर व उपनगरे, ठाणे व पुणे या जिल्ह्यांतील अधीक्षकांची पदे अपग्रेड करून अधीक्षक, निवडश्रेणी या संवर्गात ४ पदांना उपरोल्लेखित दिनांक १ जानेवारी, २००३ च्या शासन निर्णयाद्वारे मंजुरी दिली आहे. सदर पदांच्या नियमावल्या तयार करणे व त्यानुसार पात्र व्यक्तींची निवड करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून प्रगती पथावर आहे. नंदुरबार, वाशिम, हिंगोली व गोंदिया या ४ नवनिर्मित जिल्ह्यांसाठी अधीक्षकांच्या कार्यालयाची स्थापना करण्यास उपरोक्त शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे.

(क) राज्यातील जिल्ह्यांची अनुज्ञप्त्यांच्या संख्येआधारे "अ", "ब", "क" व "ड" गटात विभागणी करण्यात आली असून १,००० पेक्षा अधिक प्रधान अनुज्ञप्त्या असलेल्या ४ जिल्ह्यांचा अंतर्भाव "अ" श्रेणीत करण्यात आला आहे, ४०० ते १००० प्रधान अनुज्ञप्त्या असलेल्या जिल्ह्यांचा अंतर्भाव "ब" श्रेणीच्या जिल्ह्यात, ४०० पर्यंत अनुज्ञप्त्या असलेल्या जिल्ह्यांचा अंतर्भाव "क" गटात आणि एकही प्रधान अनुज्ञप्ती नसलेल्या वर्धा व गडचिरोली या दोन जिल्ह्यांचा अंतर्भाव "ड" गटात करण्यात आला आहे.

(ड) "अ" व "ब" श्रेणीतील जिल्ह्यांसाठी १२५ प्रधान अनुज्ञप्त्यांकरिता निरीक्षकांचा एक गट तर "क" श्रेणीतील जिल्ह्यांसाठी १०० मुख्य अनुज्ञप्त्यांसाठी निरीक्षकांचा एक गट अशी पुनर्रचना करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. निरीक्षकांच्या एका गटात १ निरीक्षक, २ दुय्यम निरीक्षक व १ सहाय्यक दुय्यम निरीक्षक (रायटर), ३ जवान व १ जवान-नि-वाहनचालक अशा ८ कर्मचाऱ्यांचा १ घटक मंजूर करण्यात आला आहे.

(ई) विभागाचा दिवसेंदिवस वाढत जाणारा कामाचा व्याप विचारात घेऊन मुंबई (उपनगरे), पुणे व नागपूर या जिल्ह्यांकरिता सध्याच्या उपअधीक्षकांखेरीज प्रत्येकी एक अतिरिक्त उपअधीक्षकाचे एक पद निर्माण करण्यास व त्याखेरीज खालील जिल्ह्यांत प्रत्येकी एक उप-अधीक्षकाचे नवीन पद निर्माण करण्यास उपरोक्त शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे.

१. रत्नागिरी, २. रायगड, ३. सांगली, ४. नाशिक, ५. कोल्हापूर, ६. औरंगाबाद.

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य हे मद्यार्क निर्मितीतील एक प्रमुख राज्य असल्याने शेजारी राज्यातून मळी व मद्यार्कासाठी मागणी असते व महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात मळी / मद्यार्क व पेय मद्य निर्यात केले जाते.

परराज्यातून होणाऱ्या मद्य तस्करीवर आळा घालण्यासाठी व पर्यायाने होणाऱ्या शासन महसुलाची हानी टाळण्यासाठी राज्यात विभागाचे एकूण १२ सीमा तपासणी नाके खालीलप्रमाणे कार्यरत आहेत.

तपासणी नाके

अ.क्र	तपासणी नाका	तालुका	जिल्हा
१	दापचारी	डहाणू	पालघर
२	करंजळी	पेठ	नाशिक
३	हाडाखेड	शिरपूर	धुळे
४	खेडदिगर	शहादा	नंदुरबार
५	पुनाड	मुक्ताईनगर	जळगाव
६	वरुड	वरुड	अमरावती
७	मानेगाव टेक	रामटेक	नागपूर
८	देवरी	देवराई	गोंदिया
९	उमरगा	उमरगा	उस्मानाबाद
१०	मंद्रुप	दक्षिण सोलापूर	सोलापूर
११	कागल	कागल	कोल्हापूर
१२	इन्सुली	सावंतवाडी	सिंधुदुर्ग

वरील प्रत्येक तपासणी नाक्यासाठी १ निरीक्षक , २ दुय्यम निरीक्षक , १ सहाय्यक दुय्यम निरीक्षक (रायटर) , ४ जवान , १ जवान-नि-वाहनचालक ही पदे निर्माण करण्यात आली आहेत. तसेच प्रत्येक तपासणी नाक्यासाठी एक जीप मंजूर करण्यात आली आहे.

शासनाने परिवहन विभाग, विक्रीकर विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभाग या तिन्ही विभागाची एकत्रित सीमा तपासणी नाके २४ ठिकाणी सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.

अ.क्र	तपासणी नाका	तालुका	जिल्हा
१	दापचारी	डहाणू	पालघर
२	करंजळी	पेठ	नाशिक
३	हाडाखेड	शिरपूर	धुळे
४	खेडदिगर	शहादा	नंदुरबार
५	पुनाड	मुक्ताईनगर	जळगाव
६	वरुड	वरुड	अमरावती
७	मानेगाव टेक (कंद्री)	रामटेक	नागपूर
८	देवरी रिपूर)	देवराई	गोंदिया
९	उमरगा	उमरगा	उस्मानाबाद
१०	मंद्रुप (नांदणी)	दक्षिण सोलापूर	सोलापूर
११	कागल	कागल	कोल्हापूर
१२	इन्सुली (बांदा)	सावंतवाडी	सिंधुदुर्ग
१३	नवापूर (बेडकीपाडा)	नवापूर	नंदूरबार
१४	पिंपळकुट्टी ()	पांढरकवडा	यवतमाळ
१५	मारवाडे	मंगळवेढा	सोलापूर

Scanned with OKEN Scanner

१६	सावनेर	सावनेर	नागपूर
१७	बोरगांव	सुरगणा	नाशिक
१८	राजुरा	राजुरा	चंद्रपूर
१९	बिलोली	बिलोली	नांदेड
२०	चोरवड	रावेर	जळगाव
२१	देगलूर	देगलूर	नांदेड
२२	खरपी	चांदुरबाजार	अमरावती
२३	अक्कलकुवा	अक्कलकुवा	नंदुरबार
२४	चंदगड	चंदगड	कोल्हापूर

विभागाचे सुधारीत आकृतीबंध

राज्य उत्पादन शुल्क विभागातील ३६११ पदांचा आकृतीबंध शासन निर्णय दि. ०१.०१.२००३ अन्वये निश्चित करण्यात आला होता. त्यानंतर, पालघर जिल्हयाची निर्मिती झाली असून शासन निर्णय, दि. ०२.०९.२०२१ अन्वये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ३६११ पदांच्या आकृतीबंधामध्ये १८९ पदांची वाढ करुन ३२ संवर्गासाठी एकूण ३८०० पदांचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यात आला होता. तथापी नांदेड व अमरावती या दोन प्रादेशिक विभागाची निर्मिती झाल्यामुळे ४२ नविन पदे निर्मण झाले, अशाप्रकारे सद्य: स्थितीत एकृण ३८४२ एवढ्या पदांना मान्यता प्राप्त आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागात सद्य: स्थितीत, कोकण,पुणे, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर,नाशिक व कोल्हापूर असे एकूण ८ प्रादेशिक विभाग आहेत. विभागीय स्तरावरील अधिकाऱ्याला विभागीय उपायुक्त असे संबोधण्यात येते. सदर पद हे उपायुक्त या संवर्गातील (वरिष्ठ श्रेणी) दर्जाचे आहे.

विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यक्षेत्रात पुर्वी ११ जिल्हे होते महसूल विभाग अमरावती व नागपूर यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जिल्हे राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांच्या कार्यक्षेत्रात येत होते. तसेच कार्यक्षेत्रातील जिल्हयांना मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा या राज्यांच्या सिमा आहेत. विभागीय उपायुक्त, नागपूर यांचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे तसेच, मद्य विक्रीच्या अनुज्ञप्त्यांमध्ये मोठी वाढ झालेली असल्यामुळे, कामकाजात वाढ झाली होती. प्रभावी नियंत्रणाच्या हृष्टीन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नागपूर विभागाचे नागपूर व अमरावती या महसूल विभागाप्रमाणे २ नविन प्रादेशिक विभाग निर्माण करणे आवश्यक होत.

तसेच, विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रात एकूण ८ जिल्हे होते. औरंगाबाद विभागातून राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत राज्याला मिळणाऱ्या महसूलाच्या अंदाजे एकूण २९% वाटा प्राप्त होत होता. त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांना तेलंगणा व कर्नाटक या राज्यांच्या सीमा असल्याने मद्य तस्करीची शक्यता जास्त होती. औरंगाबाद विभागाची लोकसंख्या, क्षेत्रफळ, गुन्हा अन्वेष्ण, अनुज्ञप्तींची संख्या, महसूल इ.चे अवलोकन केले असता औरंगाबाद विभागाचे औरंगाबाद व नांदेड या दोन प्रादेशिक विभागात विभाजन करणे आवश्यक होते.

त्याअनुषंगाने, राज्य उत्पादन शुल्क विभागातील नागपूर व औरंगाबाद या प्रादेशिक विभागांचे विभाजन करुन अनुक्रमे अमरावती व नांदेड असे दोन नवीन प्रादेशिक विभाग निर्माण करण्याची व त्यासाठी विविध संवर्गातील ४२ पदे नव्याने निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासन अ.मु.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या उप समितीने दि. २४.११.२०२१ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत उच्चस्तरीय सचिव समितीने चक्रीय पध्दतीने दि. २०.११.२०२१ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, अमरावती व नांदेड या दोन प्रादेशिक विभागासाठी खालीलप्रमाणे प्रत्येकी १९ प्रमाणे ३८ नियमित पदे व बाह्ययंत्रणेव्दारे प्रत्येकी २ प्रमाणे ४ पदे अशी एकूण ४२ नवीन पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. (सोबत शासन निर्णय जोडला आहे)

Scanned with OKEN Scanner

राज्य उत्पादन शुल्क विभागातील पदांच्या आढाव्यानुसार सुधारीत आकृतीबंध निश्चित करणे.....

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः इएसटी-१६१६/प्र.क्र.२००/राउशु-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०००३२.

दिनांक : ०२ सप्टेंबर, २०२१

वाचा -

१) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.इएसटी-२००२/सीआर-९६/इएक्ससी-४, दि.०१.०१.२००३.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/विसु-१, दि.११.०२.२०१६.

३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि -०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि.२९.०६.२०१७.

प्रस्तावना -

राज्य उत्पादन शुल्क विभागातील पदांचा आकृतीबंध संदर्भ क्र. १ येथील दि.०१.०१.२००३ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आला होता. प्रशासकीय विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील मंजूर पदांचा आढावा घेऊन सुधारित आकृतीबंधास उच्च स्तरीय सचिव समितीची मान्यता घेण्याबाबतचे निर्देश वित्त विभागाने दिले होते. त्यानुसार, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नियंत्रणाखालील आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क व त्यांचे अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील पदांचा आढावा घेउन संदर्भ क्र.३ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयान्वये गठित उप समिती तथा छाननी समितीच्या दि.०७.०५.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर छाननी समितीने आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई व त्यांच्या अधीनस्त क्षेत्रीय कार्यालयासाठी सादर केलेल्या ४३८४ सुधारित पदांच्या तुलनेत एकूण ३८०० पदांना मान्यता देऊन सदर प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीसाठी सादर करण्याचे कळविले. त्यानुसार मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दि.०३.०८.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये राज्य उत्पादन शुल्क विभागासाठी आकृतीबंध निश्चित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

२. उच्च स्तरीय सचिव समितीने आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई व त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयात ३१ संवर्गात एकूण ३८०० पदांच्या सुधारित आकृतीबंधास मंजूरी दिलेली आहे. उच्च स्तरीय सचिव समितीने राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत गट-अ संवर्गातील सह संचालक (लेखा व कोषागारे) हे पद व गट-क संवर्गातील मुख्य टंकलेखक आणि टंकलेखक या दोन संवर्गातील पदे रद्द करण्यात यावेत, असे निदेश दिलेले आहेत तर मुख्य लेखाधिकारी (गट-अ) या संवर्गात एक पद निर्माण केले आहे. त्यानुसार पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्याची बाव शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned with OKEN Scanner

शासन निर्णय:-

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई व त्यांच्या अधीनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयातील पदांच्या सुधारित आकृतीबंधास दि.०३.०८.२०१९ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्च स्तरीय सचिव समितीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार खालीलप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे :-

१) उच्च स्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेनुसार, सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे ३१ संवर्गामध्ये ३८०० पदांच्या आकृतीबंधास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२) राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत गट-अ संवर्गातील सह संचालक (लेखा व कोषागारे) हे पद रद्द करण्यात येत असून त्याऐवजी, मुख्य लेखा अधिकारी (उप संचालक, लेखा व कोषागार संवर्ग) हे पद नव्याने निर्माण करण्यात येत आहे.

३) गट-क संवर्गातील मुख्य टंकलेखक आणि टंकलेखक हे दोन संवर्ग रद्द (मृत संवर्ग) करण्यात येत आहे.

४) राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत अनुज्ञप्तीधारक घटकांकवर पर्यवेक्षणासाठी नियुक्त करावयाच्या पदांकरिता नव्याने मानके विहीत करणे व नवीन मंजूर मानकानुसार पदांची पुर्नरचना करणे याबाबतची कार्यवाही सुरू असून, ती पूर्ण होईपर्यंत सद्य:स्थितीत घटकांकरिता निर्माण केलेली / कार्यरत असलेली पदे तशीच सुरू राहतील.

५) मुख्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालयांमध्ये कामकाजाचे स्वरूप, जबाबदारी, कामाचा व्याप, इत्यादी विचारात घेऊन पदसंख्या निश्चित करण्याबाबत मंत्रालयीन प्रशासनीक विभागस्तरावर स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

६) सुधारित आकृतीबंधामध्ये मंजूर पदांसाठी वेतन व भत्त्यापोटी आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतूद करण्याबाबत आयुक्त, राउशु, मुंबई यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६९/आ.पु.क, दि.२.०८.२०२१ व क्र.३४२४/सेवा-९, दि.१२.०८.२०२१ अन्वये प्राप्त सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२१०९०२११२४३४४३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

YUVRAJ BAYAJI AJETRAO

Digitally signed by YUVRAJ BAYAJI AJETRAO
DN: CN = YUVRAJ BAYAJI AJETRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HOME DEPARTMENT
Date: 2021.09.02 11:27:10 +05'30'

(युवराज ब.अजेटराव)
उप सचिव ,महाराष्ट्र शासन.

सोबत: विवरणपत्र.

प्रत :

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

२) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.विरोधीपक्ष नेता (विधानपरिषद/विधानसभा)
४) मा.राज्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता-१/२), मुंबई/नागपूर.
८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने).
९) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११) अधिदान व लेखा अधिकारी,बांद्रा,मुंबई
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१३) उप सचिव (वित्तीय सुधारणा/आपुक/सेवा-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सह/उप सचिव, राज्य उत्पादन शुल्क, मंत्रालय, मुंबई.
१५) सह/उप सचिव (अर्थसंकल्प शाखा)/आस्थापना-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) सर्व उपायुक्त (वरीष्ठ),राज्य उत्पादन शुल्क
१७) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क
१८) कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प शाखा)/आस्थापना-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) कार्यासन अधिकारी (राउशु-२/३), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) निवडनस्ती कार्यासन, राउशु-१, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned with OKEN Scanner

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक इएसटी-१६१६/प्र.क्र.२००/राउशु-१,दि.०२.०९.२०२१ सोबतचे विवरणपत्र.

अ. क्र.	पदनाम	पदाची वेतनश्रेणी	जुन्या आकृतिबंधानुसार मंजूर पदे	सुधारीत आकृतिबंधानुसार मंजूर पदे
१	आयुक्त (भा. प्र. से.)	संवर्ग पद	१	१
२	अपर आयुक्त	१) संवर्ग पद २) S-२७ (११८५००-२१४१००)	१	१
३	सह आयुक्त	S-२५ (७८,८००-२,०९,२००)	२	२
४	उप आयुक्त (वरिष्ठ)	S-२३ (६७,७००-२,०८,७००)	८	८
५	संचालक (अंमलबजावणी व दक्षता)	S-२३ (६७,७००-२,०८,७००)	१	१
६	मुख्य लेखा अधिकारी	S-२३ (६७,७००-२,०८,७००)	०	१
७	उप संचालक (सांख्यिकी व संगणक)	S-२० (५६,१००-१,७७,५००)	१	१
८	उप आयुक्त (कनिष्ठ)	S-२० (५६,१००-१,७७,५००)	२	२
९	अधीक्षक	S-२० (५६,१००-१,७७,५००)	३६	३६
१०	लेखाधिकारी	S-१६ (४४,९००-१,४२,४००)	७	७
११	सहाय्यक आयुक्त	S-१५ (४१,८००-१,३२,३००)	१०	१०
१२	उप अधीक्षक	S-१५ (४१,८००-१,३२,३००)	४८	४८
१३	प्रमुख लेखापाल (स.ले.अ)	S-१५ (४१,८००-१,३२,३००)	८	८
१४	लघुलेखक (उच्चश्रेणी)	S-१५ (४१,८००-१,३२,३००)	८	३
१५	निरीक्षक	S-१४ (३८,६००-१,२२,८००)	२५२	२५२
१६	संशोधन सहाय्यक (संगणक)	S-१४ (३८,६००-१,२२,८००)	२	२
१७	कार्यालय अधीक्षक	S-१४ (३८,६००-१,२२,८००)	५२	५२
१८	लघुलेखक (निम्नश्रेणी)	S-१४ (३८,६००-१,२२,८००)	१६	१६
१९	उप लेखापाल (उ. ले. अ.)	S-१३ (३५,४००-१,१२,४००)	८	८
२०	दुय्यम निरीक्षक	S-१२ (३२,०००-१,०१,६००)	८३७	८९४
२१	लेखापाल	S-८ (२५,५००-८१,१००)	१९	१९
२२	टिपणी सहाय्यक / वरिष्ठ लिपिक	S-८ (२५,५००-८१,१००)	८८	८८
२३	लघुटंकलेखक	S-८ (२५,५००-८१,१००)	३६	३६
२४	सहाय्यक दुय्यम निरीक्षक	S-७ (२१,७००-६९,१००)	२७९	२२२

Scanned with OKEN Scanner

२५	लिपिक - टंकलेखक	S-६ (१९,९००-६३,२००)	२७०	२७०
२६	जवान	S-६ (१९,९००-६३,२००)	१२३७	१४३१
२७	जवान नि वाहन चालक	S-६ (१९,९००-६३,२००)	२४८	२४८
२८	पट्टा नाईक	S-३ (१६,६००-५२,४००)	८	८
२९	दप्तरबंद	S-३ (१६,६००-५२,४००)	३	३
३०	आवेष्टक (पॅकर)	S-३ (१६,६००-५२,४००)	२	२
३१	चपराशी	S-१ (१५,०००-४७,६००)	१२२	१२०
३२	सह संचालक (लेखा व कोषागारे)	S-२५ (७८,८००-२,०९,२००)	१	० (रद्द)
३३	मुख्य टंकलेखक	S-८ (२५,५००-८१,१००)	१	० (मृत संवर्ग)
३४	टंकलेखक	S-७ (२१,७००-६९,१००)	२	० (मृत संवर्ग)
			एकूण	३८००

YUVRAJ BAYAJI AJETRAO

Digitally signed by YUVRAJ BAYAJI AJETRAO
DN: CN = YUVRAJ BAYAJI AJETRAO, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = HOME DEPARTMENT
Date: 2021.09.02 11:27:53 +05'30'

(युवराज ब.अजेटराव)
उप सचिव ,महाराष्ट्र शासन.

****

Scanned with OKEN Scanner

राज्य उत्पादन शुल्क विभागात अमरावती व नांदेड हे प्रादेशिक विभाग नव्याने निर्माण करण्यास व याकरीता नवीन पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय, क्र.बीजीटी-१०२१/प्र.क्र.९६/राउशु-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ५ जानेवारी, २०२२.

संदर्भ :- १) शासन निर्णय, वित्त विभाग,क्र. असंप-१००१/प्र. क्र.२९/२००१/ वित्तीय सुधारणा, दि.१०.०९.२००१.
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.इएसटी-२००२/सीआर-९६/इएक्ससी-४, दि.०१.०१.२००३.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५.
४) शासन निर्णय, गृह विभाग, क्र.इएसटी-१६१६/प्र.क्र.२००/राउशु-१, दि.०२.०९.२०२१.

प्रस्तावना:-

राज्य उत्पादन शुल्क विभागातील ३६११ पदांचा आकृतीबंध संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णय दि.०१.०१.२००३ अन्वये निश्चित करण्यात आला होता. त्यानंतर, शासन निर्णय, दि.०२.०९.२०२१ अन्वये राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या ३६११ पदांच्या आकृतीबंधामध्ये १८९ पदांची वाढ करुन ३२ संवर्गासाठी एकूण ३८०० पदांचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागात सद्य:स्थितीत, कोकण, पुणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक व कोल्हापूर असे एकूण ६ प्रादेशिक विभाग आहेत. विभागीय स्तरावरील अधिकाऱ्याला विभागीय उपायुक्त असे संबोधण्यात येते. सदर पद हे उपायुक्त (वरिष्ठ श्रेणी) या संवर्गातील दर्जाचे आहे.

विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यक्षेत्रात सध्या ११ जिल्हे आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३०.३९ % आहे. तर लोकसंख्या २०.४७ % इतकी आहे. महसूल विभागाच्या अमरावती व नागपूर यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जिल्हे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नागपूर कार्यक्षेत्रात येतात. विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग, नागपूर यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांना मध्यप्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा या राज्यांच्या सिमा आहेत. विभागीय उपायुक्त, नागपूर यांचे कार्यक्षेत्र मोठे असल्यामुळे तसेच, मद्य विक्रीच्या अनुज्ञप्त्यांमध्ये मोठी वाढ झालेली असल्यामुळे, कामकाजात वाढ झालेली आहे. प्रभावी नियंत्रणाच्या दृष्टीने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नागपूर विभागाचे नागपूर व अमरावती या महसूल विभागाप्रमाणे २ नविन प्रादेशिक विभाग निर्माण करणे आवश्यक आहे.

तसेच, विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्या कार्यक्षेत्रात एकूण ८ जिल्हे आहेत. औरंगाबाद विभागातून राज्य शुल्क विभागामार्फत राज्याला मिळणाऱ्या महसूलाच्या अंदाजे एकूण २९ % वाटा प्राप्त होतो त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांना तेलंगणा व कर्नाटक या राज्यांच्या सिमा आहेत. त्यामुळे, मद्य तस्करीची शक्यता जास्त आहे. औरंगाबाद विभागाची लोकसंख्या, क्षेत्रफळ, गुन्हा अन्वेषण, अनुज्ञप्तींची संख्या, महसूल इ. चे

Scanned with OKEN Scanner

अवलोकन केले असता औरंगाबाद विभागाचे औरंगाबाद व नांदेड या दोन प्रादेशिक विभागात विभागणी करणे आवश्यक आहे.

याअनुषंगाने, राज्य उत्पादन शुल्क विभागातील नागपूर व औरंगाबाद या प्रादेशिक विभागांचे विभाजन करुन अनुक्रमे अमरावती व नांदेड असे दोन नवीन प्रादेशिक विभाग निर्माण करण्याची व त्यासाठी विविध संवर्गातील ४२ पदे नव्याने निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णयः-

१. राज्य उत्पादन शुल्क विभागातील नागपूर व औरंगाबाद या प्रादेशिक विभागाचे विभाजन करुन अनुक्रमे अमरावती व नांदेड असे दोन नवीन प्रादेशिक विभाग निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर दोन नवीन प्रादेशिक विभाग निर्माण झाल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे एकूण ८ प्रादेशिक विभाग व त्यांच्या कार्यक्षेत्रातील जिल्हे खालीलप्रमाणे राहतील.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	मुख्यालय	कार्यक्षेत्रातील जिल्हे
१	विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे	ठाणे	मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर.
२	विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, पुणे	पुणे	पुणे, सोलापूर, अहमदनगर.
३	विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद	औरंगाबाद	औरंगाबाद, जालना, उस्मानाबाद, बीड,
४	विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर विभाग, नागपूर	नागपूर	नागपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा.
५	विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक विभाग, नाशिक	नाशिक	नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार.
६	विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क,कोल्हापूर विभाग, कोल्हापूर	कोल्हापूर	सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.
७	विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, अमरावती विभाग, अमरावती	अमरावती	अमरावती, यवतमाळ, अकोला,वाशिम, बुलढाणा.
८	विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड विभाग, नांदेड	नांदेड	नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली

३. अ.मु.स. (सेवा), सामान्य प्रशासन विभाग व सचिव (व्यय), वित्त विभाग यांच्या उप समितीने दि.२४.११.२०२१ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत उच्चस्तरीय सचिव समितीने चक्रीय पद्धतीने दि.२०.११.२०२१ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, अमरावती व नांदेड या दोन प्रादेशिक विभागासाठी खालीलप्रमाणे प्रत्येकी १९ प्रमाणे ३८ नियमित पदे व बाह्ययंत्रणेद्वारे प्रत्येकी २ प्रमाणे ४ पदे अशी एकूण ४२ नवीन पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

(अ) नियमित पदे

अ. क्र.	पदनाम	पदाची वेतनश्रेणी	कार्यालयनिहाय पदांची संख्या		एकूण पदे
			अमरावती	नांदेड	
१	विभागीय उपायुक्त	S-२३ (६७,७००-२,८८,७००)	१	१	२
२	लेखाधिकारी	S-१६ (४४,९००-१,४२,४००)	१	१	२
३	सहाय्यक आयुक्त	S-१५ (४१,८००-१,३२,३००)	१	१	२
४	प्रमुख लेखापाल (सहाय्यक लेखाधिकारी)	S-१५ (४१,८००-१,३२,३००)	१	१	२
५	निरीक्षक	S-१४ (३८,६००-१,२२,८००)	१	१	२
६	कार्यालय अधीक्षक	S-१४ (३८,६००-१,२२,८००)	१	१	२
७	उप लेखापाल	S-१३ (३५,४००-१,१२,४००)	१	१	२
८	दुय्यम निरीक्षक	S-१२ (३२,०००-१,०१,६००)	२	२	४
९	लघुटंकलेखक	S-८ (२५,५००-८१,१००)	१	१	२
१०	वरिष्ठ लिपिक	S-८ (२५,५००-८१,१००)	१	१	२
११	जवान	S-६ (१९,९००-६३,२००)	३	३	६
१२	लिपिक-टंकलेखक	S-६ (१९,९००-६३,२००)	३	३	६
१३	जवान-नि-वाहनचालक	S-६ (१९,९००-६३,२००)	२	२	४
	एकूण नियमित पदे		१९	१९	३८

(ब) बाह्ययंत्रणेचे मनुष्यबळ

अ. क्र.	बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा	कार्यालयनिहाय मनुष्यबळ संख्या		एकूण मनुष्यबळ संख्या
		अमरावती	नांदेड	
१	चपराशी/ शिपाई	२	२	४

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील भाग पहिला, उपविभाग एक मधील अ.क्र.२, नियम क्रमांक २ अन्वये प्रशासनिक विभागास असणाऱ्या अधिकारान्वये विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, अमरावती विभाग, अमरावती व विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड विभाग, नांदेड यांना "प्रादेशिक कार्यालय प्रमुख" म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर अधिकार वित्तीय बाबींपुरतेच मर्यादित राहतील.

५. सदर अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनावर येणारा खर्च, मागणी क्र.बी-२, मुख्य लेखाशिर्ष २०३९- राज्य उत्पादन शुल्क, (००) ००१ संचालन व प्रशासन, (०२) (०१) आस्थापना निरीक्षण व प्रतिबंध (२०३९००३२) (दत्तमत) (अनिवार्य), (०१) वेतन या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर प्रादेशिक विभाग निर्मिती व अनुषंगिक पदनिर्मितीच्या अनुषंगाने, कार्यभार व अभिलेख हस्तांतरणाच्या संदर्भात आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी आवश्यकतेनुसार आदेश निर्गमित करावेत.

Scanned with OKEN Scanner

७. सदर शासन निर्णय, वित्त विभाग अनौ.सं.क्र. ३०९/व्यय-८, दि.०९.०७.२०२१ व अनौ. सं.क्र.२६५/आ.पु.क.,दि.२४.१२.२०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेस व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीने दि.२०.१२.२०२१ रोजी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२२०१०५१६४५२१३७२९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sandeep Gorakhnath Dhakane

(संदिप ढाकणे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.राज्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६) प्रधान सचिव (राउशु) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर,
८) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
९) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी,
१०) सह सचिव (व्यय/ अर्थ/आपुक/विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) उप सचिव (राउशु) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
१३) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
१४) अवर सचिव/ कक्ष अधिकारी (राउशु-२/राउशु-३), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) निवडनस्ती (राउशु-१).

Scanned with OKEN Scanner

४.विभागाची वैशिष्ठये

- शासनास महसुल मिळवून देणारा एक महत्वपुर्ण विभाग.
- कमीत कमी प्रसासकीर्य खर्चात कामकाज करणारा विभाग.
- विभागाच्या नागरीकांना तत्परतेने सेवा देणारा विभाग.

५.विभागाचे नागरीक

- मळी / मद्यार्क / मद्य उत्पादन करणारे कारखाने.
- मद्य सेवन करणाऱ्या व्यक्ती .
- अनधिकृत मद्याने पिडीत .
- सर्व प्रकारचे मद्य परवाना धारक.

६. विभागाच्या अपेक्षा

- राज्याच्या प्रगतीसाठी वापरण्यात येणाऱ्या राज्य उत्पादन शुल्क उत्पादनाचे स्त्रोत असलेल्या मद्य निर्मितीसाठी व विक्री बाबतच्या नियमांचे / कायद्याचे पालन करुन उत्पादन शुल्क वाढविण्यामध्ये सहभागी होणे.
- मद्य सेवन करावयाचे असेल तर प्रचलित नियमांचे पालन करावे.
- उत्पादन शुल्क भरलेलेच मद्य खरेदीने सेवन करावे.
- अधिकृत किरकोळ विक्रेत्याकडून अथवा परवाना कक्षातून मद्य विकत घ्यावे.
- मद्य सेवन परवाना धारण करावा.
- गावठी दारु विरुध्द आमच्या मोहिमेस साथ करा.

७.अबकारी बाबत शासनाचे धोरण

- विविध प्रकारची मद्य उत्पादने अनुज्ञप्तीद्वारे विधिवत नियंत्रित करणे.
- सध्या भारतीय बनावटीचे विदेशी मद्य किरकोळ विक्रीसाठी देण्यात येणाऱ्या अनुज्ञप्ती मंजूरीवर निर्बंध आहेत. मात्र एफएल-III अनुज्ञप्त्या (परवाना कक्ष) एफएलबीआर-II (सीलबंद बिअर विक्री) अनुज्ञप्त्या मंजूर केल्या जातात.
- महाराष्ट्र राज्यात देशी / विदेशी मद्य खरेदी करणे , जवळ बाळगणे,वाहतूक करणे ,वापरणे आणि प्राशन करण्याबाबत कमीत कमी २५ वर्ष वय आहे. परंतू सौम्य बिअर साठी सदरचे वय २१ वर्ष आहे.
- मात्र वर्धा, गडचिरोली जिल्ह्यात संपूर्ण दारुबंदी असून मद्य सेवन फक्त वैद्यकीय शिफारशीनुसार करता येते.

Scanned with OKEN Scanner

८.विभागाची उद्दिष्टे

- ❖ मद्यार्कयुक्त पेयांच्या कायदेशीर उत्पादन व विक्रीपासून तसेच विविध अनुज्ञप्ती शुल्काच्या माध्यमातून महसूल वाढविणे.
- ❖ मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत मद्यार्कयुक्त पेयांचे उत्पादन करणेसाठी , घाऊक व किरकोळ विक्रीसाठी तसेच वापरासाठी ,औषधे व सौंदर्य प्रसाधनांच्या उत्पादनासाठी व मद्यार्काच्या औद्योगिक वापरासाठी अनुज्ञप्ती मंजूर करणे.
- ❖ मळी उत्पादनासाठी, मळी विक्रीसाठी व मळीच्या उर्ध्वपतनासाठी व मद्यार्काच्या औद्योगिक वापरासाठी अनुज्ञप्ती मंजूर करणे.
- ❖ शुध्द मद्यार्काच्या उत्पादनासाठी , मद्य उत्पादनासाठी व मद्यार्काच्या औद्योगिक वापरासाठी अनुज्ञप्ती मंजूर करणे.
- ❖ मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ व एन.डी.पी.एस.ॲक्ट ,१९८५ नुसार अनुक्रमे मादक पदार्थांच्या बेकायदेशीर उत्पादनास प्रतिबंध करणे व नार्कोटिक्स ड्रग्जवर नियंत्रण ठेवणे.

९.विभागाचा उद्देश

- ❖ मद्यार्कयुक्त पेयाच्या उत्पादनास, विक्रीस व वापरास नियंत्रित व नियमित करुन उत्पादन शुल्क वाढविणे.
- ❖ साध्या व पारदर्शक नियमावलीवर आधारीत कार्यपध्दती तयार करुन सर्व माहिती पुस्तिकेद्वारे प्रसिध्द केली जाईल.
- ❖ आवश्यक कागदपत्रांची यादी व छापील अर्ज पुरविण्यात येतील.
- ❖ अनुज्ञप्ती व परवाना मंजूरी कालबध्द असलेले नागरीकांच्या संपर्कात असणाऱ्या / जवळच्या राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त अधिकार देण्यात येतील.
- ❖ महसूल जमा विवरण व अभिलेख सुटसुटीत करुन माहिती व तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर केला जाईल.
- ❖ विभागाचे अधिकारी विनम्र , सौजन्यशिल आणि दृढ निश्चयी असतील , ते निरीक्षणासाठी येताना गणवेषात असतील तसेच त्यांच्याकडे ओळखपत्र किंवा अधिकार पत्र असेल.
- ❖ निरीक्षण पत्राचे नमुने तयार केले जातील व निरीक्षण अहवाल व इतर कागदपत्रे अनुज्ञप्ती धारकांना जागीच दिली जातील.
- ❖ कायद्याचे पालन करणाऱ्या नागरीकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. तक्रारीवर त्वरीत कार्यवाही केली जाईल.
- ❖ जनतेशी सौजन्यशील / सौजन्यपूर्वक संबंध ठेवण्यास / वाढविण्यात येतील.
- ❖ नागरीकांच्या तत्पर सेवेसाठी सूचना स्वागतार्ह आहेत.

१०. विविध अनुज्ञप्ती मंजूर करण्यासाटी कालमर्यादा /सक्षम अधिकारी.

सोबत अधिसुचना जोडली आहे.

Scanned with OKEN Scanner

२५१

अधिसुचना

गृह विभाग, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दि. २८ डिसेंबर, २०२०

